६) प्रस्तावित बांधकाम करीत असतांना आजुबाजुच्या भुखंडाची वहीवाट, प्रकाश, हवा इ. बाधीत होणार नाही तसेच नियोजित बांधकामामुळे भुखंडावर असलेल्या कोणत्याही वहिवाटीचे हक्काचा भंग होणार नाही याची जबाबदारी अर्जदार / जमीन मालकाची राहील.

७) मंजुर नकाशा व्यतीरिक्त त्यात फेरबदल करावयाचे असल्यास या कार्यालयाची पुर्व परवानगी (मंजुरी) घेणे आवश्यक राहील.

८) या बांधकाम परवान्याची मुदत परवानगी प्राप्त झाल्याच्या तारखेपासून एक वर्षाची आहे. या कालावधीत बांधकाम पुर्ण न झाल्यास मुदत संपण्यापुर्वी या प्रमाणपत्राचे नुतनीकरण करण्यांत यावे. नुतनीकरण प्रत्येक वर्षाची मुदत संपण्यापुर्वी मुदतवाढ घेवून <u>तीन वर्षा</u> पर्यंत मंजुर करता येईल.

९) बांधकाम सुरू करण्यात येत असल्याबाबतची सुचना या कार्यालयास विहीत नमुन्यात (Appendix 'F' मध्ये) देण्यात यावी.

१०) जोत्या पर्यंत (Plinth level) बांधकाम पुर्ण झाल्यानंतर याबाबतची माहिती विहीत नमुन्यात (Appendix 'G' मध्ये) या कार्यालयास कार्यालयास देण्यांत यावी. याप्रमाणे सदर कामास या विहीत नमुन्यात (Appendix 'H' मध्ये) प्रमाणित केल्यानंतर पुढील काम सुरू करण्यांत यावे.

११) उपयोगिता प्रमाणपत्र (Occupancy Certificate) मंजुर झाल्याशिवाय नविन ईमारत किंवा ईमारतीचे कोणत्याही हिस्स्याचा उपभोग करण्यांस किंवा उपभोग करण्याची मंजुरी किंवा कोणत्याही व्यक्तिला वापर करण्याचा परवाना देता येणार नाही. उपयोगिता प्रमाणपत्राकरिता इमारत मालक व आर्किटेक्ट यांनी अपेंडीक्स (J) मध्ये बांधकाम पुर्ण झाल्याच्या नकाशाच्या तीन प्रतिसह अर्ज या कार्यालयाडे सादर करावा.

१२) मंजुर बांधकाम नकाशाविरूध्द कोणतेही बांधकाम केल्यास ते अनधिकृत गृहीत धरण्यात येईल याची नोंद घ्यावी. अनधिकृत बांधकाम केल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६ नुसार जमिन मालक / विकासकर्ता व आर्किटेक्ट कारवाईस पात्र ठरतील.

१३) स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी (Structural Stability) संबंधी सक्षम स्थापत्य अभियंत्याकडील प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यात यावे.

१४) नियोजित बांधकाम भूकंपरोधक करण्याचे दृष्टीने सक्षम स्थापत्य अभियंत्याकडून त्याचे भारतीय मानक संस्थेने प्रमाणित केल्याप्रमाणे नकाशे व आराखडे परवाना धारकाने प्राप्त करुन घेवून त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी. तसेच त्या आराखडयानुसार सक्षम स्थापत्य अभियंताचे देखरेखीखाली बांधकाम पुर्ण करुन घेण्याबाबतचा व त्याप्रमाणे बांधकाम हे भारतीय मानक संस्थेने विहीत केलेल्या तरतुदीनुसार पुर्ण करुन घेण्यात आल्याबाबत सक्षम अभियंत्याचा दाखला या कार्यालयास सादर करण्यात यावा. त्याशिवाय बांधकाम पुर्णत्वाचा दाखला देता येणार नाही.

१५) इमारतीच्या पायऱ्या, दरवाजे, खिडक्या वरील छज्जा, गॅलरी, जिन्याचे प्रोजेक्शन वगैरे हे सर्व स्वतःच्या मालकीच्या जागेतच असावयास पाहिजे.

१६) भुखंडात पावसाच्या पाण्याचे संवर्धन (RAIN WATER HARVESTING) ची व्यवस्था विकासकर्त्यास करावी लागेल. सिव्हर लाईन ला पावसाच्या पाण्याची पाईप लाईन जोडण्यात येवू नये.

१७) भुखंडावरील रिकाम्या जागेत विकासकर्त्याने नियमानुसार किमान आवश्यक झाडे लावावी व ती झाडे मोठी होतपर्यंत त्यांचे संगोपन करावे.

१८) 'इमारत व बांधकाम व्यवसायातील कामगार' यांच्या संदर्भात कामगार विभागाने निर्गमित केलेल्या नियम/परिपत्रक/प्रचलित आदेश यांची जमीन मालक/विकासक यांनी पुर्तता करणे बंधनकारक राहील.

१९) नवीन चंद्रपूर या अधिसुचित क्षेत्राकरीता लागु प्रमाणित इमारत उपविधी व विकास नियंत्रण नियमावली नुसार पिण्याचे पाण्याची आणि सिव्हेज डिस्पोजलची व्यवस्था विकासकर्त्यास स्वतःकरावी लागेल. तसेच उक्त नियमावलीनुसार आवश्यक संपुर्ण सॅनीटरी कार्य पुर्ण करणे अर्जदारास बंधकारक राहील.

२०) पाणी पुरवठा, सिव्हेज डिस्पोजल सिस्टीम, बिल्डींग सर्व्हीसेस चा सर्व्हीस प्लान (Plans, Elevations and Sections सह) स्वतंत्ररित्या मंजुरी करीता सादर करावा.

२१) उक्त वापराचे अनुषंगाने सोर ऊर्जेवर पाणी तापवण्याची यंत्रणा अर्जदार यांनी स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील.